**विदेशात विशेष अध्ययन करण्याकरीता अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेंतर्गत प्रशासकीय खर्चाच्या रक्कमेतुन पुनर्मेळ करण्याकरिता आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांना प्राधिकृत करण्याबाबत**

# महाराष्ट्र शासन

**सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः पशियो-२०२५/प्र.क्र.१३६/शिक्षण-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु मार्ग
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक: ०७ मे,२०२६

**संदर्भ:-** आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचे पत्र क्र. सकआ/ शिक्षण/ पर.शिष्य/ CGST+ SGST/ BSC/ रु.३/ जादा दर / २५-२६/ का-४ ई/ १७८३पुणे/ दि.०४.०५.२०२६

**प्रस्तावना :-**

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात नामांकित शिक्षण संस्थेत शिक्षणाची संधी मिळावी याकरीता सन २००३ पासून परदेशी शिष्यवृत्ती योजना लागू केली आहे. सदर योजनेच्या नियमावलीमध्ये कालानुरुप वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या असुन, दिनांक २७ जून, २०१७ च्या शासन निर्णयान्वये या योजनेची सुधारीत नियमावली विहीत करण्यात आलेली आहे. तद्नंतर, दिनांक ३० जून, २०१८ च्या शासन निर्णयान्वये सदर योजनेअंतर्गत लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या ७५ इतकी विहीत करण्यात आलेली आहे.

२. कोणत्याही वस्तुची खरेदी किंवा सेवा यासाठी GST समाविष्ट करुन रक्कम आहरित केली जाते. परंतु सदर परदेश शिष्यवृत्ती योजनेच्या शासन निर्णयामध्ये अशी तरतूद नसल्याने विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रक्कमेमधून सदर रक्कम वजा होते. प्रचलित कार्यपध्दतीमुळे CGST+ SGST कर व SBI Pune Main या बँकेचे Swift चार्जेस तसेच Foreign Bank Charges इ. बाबींची रक्कम भरावी लागत असल्याने परदेशात शिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांना/विद्यापीठास प्रत्यक्षात देय शिष्यवृत्ती रक्कमेपेक्षा कमी रक्कम अदा होते. त्यामुळे विदयार्थी व विद्यापीठ कमी अदा केलेल्या शिष्यवृत्ती रक्कमेतील फरकाची रक्कम मिळणेबाबत तगादा लावत असतात. तसेच सदर रक्कम मिळणेबाबत विद्यायार्थ्यांचे पालक वारंवार ई-मेल / दुरध्वनीद्वारे संपर्क साधत असतात. त्याचबरोबर परदेश शिष्यवृत्तीची मंजुर झालेली रक्कम बँकेद्वारे स्विफ्टनुसार विद्यापीठ व विद्यार्थी यांच्या परदेशातील बँक खात्यात जमा करताना, बऱ्याच वेळेस परदेशी चलनाच्या भारतीय चलनातील विनिमय दरांमध्ये चढ-उतार होतो. तसेच परदेश शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न मर्यादा ही रु.८.०० लाख असून हे विद्यार्थी आर्थिक वंचित घटकातील असतात व परदेशामध्ये आर्थिक मदतीसाठी विद्यार्थ्याचे कोणीही नातेवाईक नसतात. या सर्व कारणांमुळे विदयार्थ्यांना कमी निधी मिळाल्यास अडचणींना सामोरे जावे लागते.

३.	सबब सदर शिष्यवृत्तीची रक्कम मंजुर करताना अनुज्ञेय शिष्यवृत्ती रक्कमेच्या मर्यादेतच शिष्यवृत्तीच्या रक्कमांकरिता योजनानिहाय बँक खाते उघडुन सदर योजनेंतर्गत निर्गमित होणाऱ्या १% प्रशासकीय खर्चाच्या रक्कमेतून पुनर्मेळ करण्याकरिता आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांना प्राधिकृत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

विदेशात विशेष अध्ययन करण्याकरीता अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेकरीता शिष्यवृत्तीची रक्कम मंजुर करताना CGST+ SGST कर, SBI Pune Main या बँकेचे Swift चार्जेस, Foreign Bank Charges तसेच परदेशी चलनाच्या भारतीय चलनातील विनिमय दरातील फरक यांकरीता अनुज्ञेय शिष्यवृत्ती रक्कमेच्या मर्यादेतच शिष्यवृत्तीच्या रक्कमांकरिता योजनानिहाय बँक खाते उघडुन सदर योजनेंतर्गत निर्गमित होणाऱ्या १% प्रशासकीय खर्चाच्या रक्कमेतून पुनर्मेळ करण्याकरिता आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांना प्राधिकृत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०५०७११३६१२८१२२ आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन देण्यात येत आहे.

महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या आदेशाने व नावाने.

DESHMUKH VARSHA GUNVANT

Digitally signed by DESHMUKH VARSHA GUNVANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SJSA, 2.5.4.20=318374474BDBBEE0A87FA98C6CE4ADDBC6F40C52596BC652C9C91F0A77A35550, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B030780A012E3648CB356030F4D4BFD6DCFED5E1526059A46C087A14FE3C29A0, cn=DESHMUKH VARSHA GUNVANT
Date: 2026.05.07 11:37:08 +05'30'

**( वर्षा देशमुख )**
**शासनाच्या उप सचिव**

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव.
३) मा. राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव.
४) मा. मुख्य सचिव यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये, मंत्रालय, मुंबई.
६) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई .
७) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, मुंबई.
१०) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.
१३) कुलगुरू, सर्व विद्यापीठे महाराष्ट्र राज्य.